महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.४७/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५४ दि. २७/०३/२०१७

विषय : महावितरण कंपनीमधील अधिकारी/कर्मचारी यांना घरभाडे भत्ता शासनाने शहरे/गावे यांचे पुर्नवर्गीकरण केल्यानुसार मंजूर करणेबाबत.

........

पुर्वीच्या म.रा.वि.मंडळ व मंडळाच्या विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या महावितरण कंपनीमधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य आदेश क्र.६८ (क) दि.३०.०६.१९७२ मधील तरतुदींनुसार घरभाडे भत्ता अदा करण्यात येतो. सदर अदा करण्यात येत असलेल्या घरभाडे भत्त्याचे दर शासनाच्या धर्तीवर वेळोवेळी सुधारित करण्यात आलेले आहेत.

२. आता वित्त विभाग,महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन निर्णय क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/ सेवा-५ दि.१६.१२.२०१६ अन्वये घरभाडे भत्त्याच्या प्रयोजनार्थ करण्यात आलेले शहरांचे/गावांचे वर्गीकरण सुधारित केले असून प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करून शासन निर्णय दि.१६.१२.२०१६ च्या धर्तीवर महावितरण कंपनीमधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना घरभाडे भत्ता मंजुरीकरिता शहरांचे/गावांचे सुधारित वर्गीकरण अंगिकृत करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. घरभाडे भत्ता मंजुरीसाठी शहरांचे/गावांचे सुधारित वर्गीकरण सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार राहील. तसेच या शहरांच्या/गावांच्या परिक्षेत्रातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना नवीन वर्गीकरणानुसार घरभाडे भत्ता माहे डिसेंबर २०१६ पासून खालील दरानुसार लागू राहील.

| अ.क्र. | शहरांचे / गावांचे वर्गीकरण | घरभाडे भत्त्याचे दर (मूळ वेतनाची टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | एक्स | ३० टक्के |
| २ | वाय | २० टक्के |
| ३ | झेड | १० टक्के |

४. घरभाडे भत्त्याच्या अनुज्ञेयतेबाबतच्या इतर सर्व तरतुदी व अटी अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP पोर्टलवर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

*D:\O&M\Adm.Circular-F.N.47-H.R.A..doc*

**परिशिष्ट - अ**

**घरभाडे भत्ता मंजुरीसाठी राज्यातील शहरांचे / गावांचे सुधारित वर्गीकरण**

| शहरांचे / गावांचे वर्गीकरण | शहरांची / नागरी समूहांची नावे | नागरी समूह घटक व त्यात येणारे क्षेत्र | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | |
| **एक्स वर्ग शहरे** | मुंबई (नागरी समूह) | १ | बृहन्मुंबई (महानगरपालिका) |
| | | २ | मीरा-भाईंदर (महानगरपालिका) |
| | | ३ | ठाणे (महानगरपालिका) |
| | | ४ | नवी मुंबई (महानगरपालिका) |
| | | ५ | कल्याण-डोंबिवली (महानगरपालिका) |
| | | ६ | उल्हासनगर (महानगरपालिका) |
| | | ७ | अंबरनाथ (नगरपरिषद) |
| | | ८ | कुळगांव-बदलापूर (नगरपरिषद) |
| | पुणे (नागरी समूह) | १ | पुणे (महानगरपालिका) |
| | | २ | पुणे (छावणी) |
| | | ३ | खडकी (छावणी) |
| | | ४ | पिंपरी-चिंचवड (महानगरपालिका) |
| | | ५ | देहू रोड छावणी |
| | | ६ | देहू (सी.टी.) |
| **वाय वर्ग शहरे** | नागपूर (नागरी समूह) | १ | नागपूर (महानगरपालिका) |
| | | २ | डिगडोह (सी.टी.) |
| | | ३ | वाडी (सी.टी.) |
| | नाशिक (नागरी समूह) | १ | नाशिक (महानगरपालिका) |
| | | २ | एकलहरे (सी.टी.) |
| | | ३ | देवळाली (छावणी) |
| | | ४ | भगूर (नगर परिषद) |
| | अमरावती महानगरपालिका | | |
| | औरंगाबाद (नागरी समूह) | १ | औरंगाबाद (महानगरपालिका) |
| | | २ | औरंगाबाद (छावणी) |
| | भिवंडी (नागरी समूह) | १ | भिवंडी-निजामपूर (महानगरपालिका) |
| | | २ | खोनी (सी.टी.) |
| | सोलापूर महानगरपालिका | | |
| | कोल्हापूर (नागरी समूह) | १ | कोल्हापूर (महानगरपालिका) |
| | | २ | गांधीनगर (सी.टी.) |
| | वसई-विरार शहर महानगरपालिका | | |
| | मालेगाव (नागरी समूह) | १ | मालेगाव (महानगरपालिका) |
| | | २ | भायगांव (ओ.जी.) |
| | | ३ | दरेगांव (ओ.जी.) |
| | | ४ | सोयगांव (सी.टी.) |
| | | ५ | द्याने (सी.टी.) |
| | | ६ | माळदे (सी.टी.) |
| | नांदेड-वाघाळा महानगरपालिका | | |
| | सांगली (नागरी समूह) | १ | सांगली मिरज कुपवाड (महानगरपालिका) |
| | | २ | माधवनगर (सी.टी.) |

**टीप** :- राज्यातील जी अन्य शहरे/गावे एक्स किंवा वाय वर्गात समाविष्ट नाहीत, त्यांचा समावेश झेड वर्गात होतो.